जावक क्रमांक ९३८६ /रोविवि/जिन्या/नाग/कुलर/२०२४
जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर
दिनांक ११ मार्च, २०२४

# जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

## कुलरची देखभाल करण्यासंबंधी दरपत्रक मागविण्याबाबत सुचना

## (परिशिष्ट-अ)

जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर चे अधिनस्थ नागपूर मुख्यालयात कार्यरत असलेल्या सर्व न्यायालयातील/विभागातील कुलर देखभाल संबंधी दिनांक १८.०३.२०२४ रोजीचे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत **'माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर'** यांचे नावाने स्थानिक कुलर दुरुस्ती करणारी फर्म/कंपनी/कंत्राटदारांकडून खालील नमूद कुलरचे देखभालीचे कामासंबंधी सिलबंद निविदा (दरपत्रक) मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | ४ फूट उंची पेक्षा कमी उंच असलेले कुलरचे देखभालीचे दर | ४ फूट उंची पेक्षा जास्त उंच असलेले कुलरचे देखभालीचे दर |
|---|---|---|---|
| १ | कुलरचे खराब झालेले वुडवुल काढून नवीन वुडवुल लावणे | | |
| २ | कुलरचा नादुरुस्त वाटरपंप काढून नवीन वाटरपंप लावणे | | |
| ३ | कुलरचा नादुरुस्त मोटार काढून नवीन मोटार लावणे | | |
| ४ | प्रती कुलरचे मासीक देखभाल खर्च | | |

**टिप क्र. १ :-** **वरील तक्त्यात अनुक्रमांक ४ मध्ये प्रती कुलरचे मासीक देखभाल खर्चाचे संबंधाने स्पष्ट करण्यात येते की, कुलर देखभाल चे कामात खालील बाबी समाविष्ट राहतील.**

**१. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर चे अधिनस्थ नागपूर मुख्यालयातील सर्व न्यायालयात/विभागात असलेले (जवळपास १३० कुलर) त्या त्या न्यायालयाचे/विभागाचे ठरलेल्या जागेवर स्थापित करणे,**

**२. कुलरमध्ये काही किरकोळ दुरुस्ती असल्यास ती दुरुस्त करणे (जसे पाईप बदलविणे, बटन व रेग्युलेटर बदलविणे, वायर बदलविणे, कुलरमध्ये इलेक्ट्रीक शॉक तपासणी इत्यादी)**

**३. न्यायालयाचे इमारतीमधील लहान मोठे कुलर मागणीनुसार इतरत्र हलविणे**

**टिप क्र. २ :-** **उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.१ ते ४ मध्ये दर्शविलेल्या कामाचे स्वरुपानुसार स्वतंत्ररित्या दर सादर करावे.**

## कंत्राटदारास खालील अटी व शर्तीनुसार कुलर देखभाल संबंधीचे काम करावे लागेल.

१. कुलरची मोटार, वाटरपंप, वुडवुल व इतर किरकोळ वस्तु बदलविणे गरजेचे वाटल्यास कार्यालय त्या वस्तु खरेदी करेल व कंत्राटदारास त्या नवीन वस्तु उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या दराप्रमाणे कुलरला लावून दयाव्या लागतील.

२. निविदाकारांनी उपरोक्त तक्त्यात सादर केलेल्या दरांची तुलना केल्यानंतर ज्या निविदाकाराचे दर कमी राहील त्या निविदाकाराचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल.

३. करारनामा करण्यासाठी कंत्राटदारास रु. १००/- चा स्टॅम्प पेपर आणावा लागेल.

४. कुलरचे देखभालीचे कामाचे देयक दर महिण्याचे शेवटच्या तारखेस सादर करावे लागेल. देयक सादर केल्यानंतर देयकाचे प्रदान होण्यास साधारणत: १ महिण्याचा कालावधी लागू शकतो.

५. दरपत्रकामध्ये काही बाबी समाविष्ट करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहे.

६. यशस्वी निविदाकारास दिनांक ३१.०३.२०२४ पुर्वी सुरक्षा ठेव रक्कम रु. ५०००/- रोख किंवा धनाकर्षाव्दारे (Demand Draft ) कार्यालयात जमा करावा लागेल. निविदाकारास सुरक्षा ठेव रकमेवरील व्याज देय राहणार नाही. कुलर देखभालीचे करारनाम्याची मुदत संपल्यानंतर निविदाकाराची सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात येईल.

७. निविदाकारास कुलर दुरुस्ती देखभालीचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक राहील व निविदाकाराने वेळेत काम पूर्ण न केल्यास अपूर्ण असलेले काम बाहेरिल इतर व्यक्तीकडून ते पूर्ण करुन घेण्यात येईल व त्या कामाकरीता लागणारा खर्च निविदाकाराचे सुरक्षा ठेव रकमेतून वजा करण्यात येईल व उर्वरित रक्कम करारनाम्याचा कालावधी संपल्यानंतर निविदाकारास परत करण्यात येईल. कुलर दुरुस्तीचे कामात हयगय दिसून आल्यास निविदाकाराची सुरक्षा ठेव जप्त करुन शासनाकडे जमा करण्यात येईल.

८. कुलर दुरुस्ती/देखभाल संबंधाने न्यायालयांकडून येणा-या तक्रारींचे त्वरीत निराकरण करणे निविदाकारास बंधनकारक राहील व त्या संबंधाने निविदाकारास तक्रारींचे निवारण केल्याबाबतची माहिती कार्यालयाकडे सादर करावी लागेल.

९. यशस्वी निविदाकाराने दिनांक ०१.०४.२०२४ पुर्वी जिल्हा न्यायालयातील सर्व कुलरच्या तांत्रिक बाबी सुव्यवस्थित आहेत किंवा नाही ? याबाबतचे निरीक्षण करुन तसे कार्यालयास कळवावे, जेणेकरुन कार्यालयास कुलरचे सामान उपलब्ध करुन देणे सोईचे होईल.

निविदाकारांनी दरपत्रकासोबत स्वत:चे आधार कार्ड, पॅन कार्डची स्वसाक्षांकित प्रत जोडावी तसेच देयकासंबंधाने आणखी काही कागदपत्रांची गरज भासल्यास निविदाकारांनी ते कार्यालयास उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

कुलर देखभालीचे कामाचा करार दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते ३० जून २०२४ पर्यंत राहील.

दिनांक १८.०३.२०२४ रोजीचे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा दिनांक १९.०३.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता माननीय प्रभारी अधिकारी, जड वस्तु संग्रह तथा तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे निजी कक्षात निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल. करीता निविदाकारांनी दिनांक १९.०३.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता मा. प्रभारी अधिकारी जड वस्तु संग्रह तथा तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे निजीकक्ष, रुम नं. ३१६, ३ रा माळा, न्यायमंदिर इमारत, जिल्हा न्यायालय, नागपूर येथे न चुकता वेळेवर हजर रहावे.

दरपत्रकाचे लिफाप्यावर **'कुलर देखभाल कामाचे दरपत्रक'** असे नमूद करावे व माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे नावाने लिफापा पाठवावा. दरपत्रक दिनाक १८.०३.२०२४ रोजीचे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल.

उपरोक्त दरपत्रक सुचना https://districts.ecourts.gov.in/nagpur किंवा https://court.mah.nic.in/courtweb या वेबसाईटवर तसेच नोटीस फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

आदेशान्वये,

[signature] 11/03/2024

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नागपूर